0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) या कार्यालयाचे आदेश क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०१३/जा.४५३, दि.२०/०५/२०१३.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे दिनांक २६/०७/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०१३/जा. ८७०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.

दिनांक : २८/०८/२०१३.

### आदेश शुध्दीपत्र

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे वाचावे क्र. २ अन्वये प्राप्त अहवालामध्ये, या कार्यालयाद्वारे वाचावे क्र. १ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार जप्त खाद्यतेलाची विल्हेवाट लावताना प्रत्यक्ष मोजमाप केले असता ७०.५२ क्विंटल खाद्यतेल आढळुन आले. त्यापैकी मे. ठक्कर ट्रेडींग कंपनीला ४८.१५ क्विंटल व मे. फुड बाजारला २२.३७ क्विंटल खाद्यतेल देण्यात आले. उर्वरीत खाद्यतेलाचे डब्बे व पॅाकेट फुटल्यामुळे वाहुन गेल्याचे मे. फुड बाजारचे सुपरवायझर श्री. जनार्दन काळुराम काळे यांनी सांगितले. त्यामुळे विल्हेवाटीसाठी प्रलंबित साठा उपलब्ध नाही. तसेच फिर्याद दाखल करण्यापुर्वी जप्त करण्यात आलेला ९५.५० क्विंटल खाद्यतेल साठा मे. फुड बाजारचे सुपरवायझर श्री. जनार्दन काळुराम काळे यांना सुपूर्द करताना सदरच्या साठ्याची विक्री न करता विल्हेवाटीचे आदेश येईपर्यंत सुरक्षित ठेवण्याची सुचना दिली होती. विल्हेवाटीचे वेळी प्रत्यक्ष साठ्याचे मोजमाप केल्यानंतर कमी आढळलेल्या साठ्यानुसार खाद्यतेलाचे पुरेसे जतन केले नसल्याने २२.३५ क्विंटल साठ्याचा मे. फुड बाजारने अपहार केला असल्याचे निदर्शनास येते, असे नमूद केले आहे.

0002 उपरोक्त बाबींचे अवलोकन करता, जप्त करण्यात आलेल्या एकूण ७०.५० क्विंटल खाद्यतेलाच्या साठ्याची ४८.१५ क्विंटल खाद्यतेलाची रक्कम शासनजमा करण्यात आल्याने उर्वरीत २२.३५ क्विंटल खाद्यतेलाच्या साठ्याची रक्कम शासनजमा न केल्यास शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब, मे. फुड बाजार यांनी अपहार केलेल्या खाद्यतेलाच्या २२.३५ क्विंटल साठ्याच्या बाजारभावाप्रमाणे येणारी रक्कम पोलिसांनी मे. फुड बाजार यांचेकडून दंड म्हणून वसूल करावी व येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

(सही)

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

---

प्रति,

१) मे. फुड बाजार, के स्टार्सचे मालक
२) मे. फुड बाजार, के स्टार्सचे सुपरवायझर जनार्दन काळूराम काळे
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गोवंडी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गोवंडी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची <u>तात्काळ</u> अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

(सही)

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.